जावक नं ४३६८ /२०१८
सिंहगड रोड पोलीस स्टेशन पुणे
दिनांक १८ /०६/२०१८

प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

**यांना सविनय सादर,**

<u>रिपोर्ट</u> :- एस.एस.धुमाळ महिला.पोलीस उप-निरीक्षक, सिंहगडरोड पो स्टे पुणे शहर

विषय :- दाखल गुन्हयातील पळवुन नेलेल्या मुलाचा वर्तमान पत्रात वर्णन प्रसिध्द होणेबाबत...

महोदय

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, सिंहगडरोड पो. स्टे पुणे शहर कडील गु.रजि.नं २७७/२०१८, भा.द.वि कलम ३६३ मधील फिर्यादी नामे शिला अशोक वाघमारे, वय- ३० वर्षे, धंदा- घरकाम, रा. केअर ऑफ झागडे याचे घर, पवार यांची पिठाच्या गिरणी जवळ, तुकाई नगर, पुणे, यांनी तिची मुलगी नामे सपना वाघमारे, वय- १६ वर्षे, दि. १७/०६/२०१८ रोजी सकाळी १०.०० वा चे सुमारास त्यांनी त्यांच्या पाच मुलांना त्यांची आई नामे- शिताबाई भगवान जाधव, रा. निखील गार्डन, फ्लॅट नं. ८, माणिकबाग, ब्रम्हा हॉटेल जवळ, सिंहगड रोड पुणे येथे सोडुन त्या कामाकरीता गेले. दुपारी फिर्यादी १२.३० चे सुमारास फिर्यादी कामावरुन आईच्या घरी गेल्या व तिघींना कपडे व इतर सामान आपण खरेदी करायला जावु असे म्हणाले असता त्यांची दोन नंबरची मुलगी नामे सपना अशोक वाघमारे हि फिर्यादी सोबत आली नाही. व नंतर फिर्यादी हे सामान खरेदी करुन दुपारी ०१.३० वा च्या सुमारास त्यांचे आईचे घरी आले असता त्यांची मुलगी सपना वाघमारे, वय- १६ वर्षे, हि घरी दिसली नाही. म्हणुन यांनी पोलीस चौकीमध्ये येवुन कोणीतरी अनोळखी इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणासाठी फिर्यादी यांचे कायदेशिर रखवालीतुन पळवुन नेले आहे म्हणुन याचे विरुध्द कायदेशीर तक्रार दिली आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे-

रंगाने – गोरी, अंगाने - मध्यम, ऊंची - अंदाजे ५ फुट, चेहरा गोल, नाक- सरळ, केस- मोकळे सोडलेले, अंगात नेसणेस- टॉप काळ्या रंगाचा व लेगीज काळ्या रंगाची व अंगात काळ्या रंगाचे जाकीट. दोन्ही पैकी एका पायावर लाल चट्टा असलेला ई.

तरी सदर मुलीचा वर्तमान पत्रात वर्णन प्रसिध्द होणेस विनंती आहे. सदर मुलगी मिळुन आल्यास सिंहगडरोड पोलीस स्टेशन,फोन नं ०२०२४३४८२७० व ८६९३८८८५१२ या नंबरवर कळविणेस विनंती आहे.